भाग दोन

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



संपादक


लुदमिला शेकाचेव्हा | श्री. राजेंद्र फाळके | डॉ. स्नेहल तावरे
डॉ. विठ्ठल शिवणकर | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | डॉ. संजय नगरकर

तेविसावी

आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'

## भाग २


संपादक

• लुदमिला शेकाचेव्हा • श्री. राजेंद्र फाळके • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... संपादक /११

१) निश्चयाचा महामेरू प्रा. रामदास कातकडे /१३
डॉ. बाळासाहेब विखे पाटील : जीवन व कार्य

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रा. दिलीप कोने /१७
: भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

३) जे. पी. नाईक यांच्या सामाजिक आणि प्रा. मेघा पाटोळे /२१
शैक्षणिक योगदानाचा परिचय

४) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे प्रा. संगीता साळवे /२५
सामाजिक परिवर्तनातील योगदान

५) श्री. भास्करराव पेरे पाटील यांचे पाटोदा प्रा. दीपक मढवई /२९
ग्राम विकासातील योगदान

६) शिक्षणातील दीपस्तंभ : कै. गुरुवर्य प्रा. धनाजी चव्हाण /३३
चं. वि. तथा बापुसाहेब झपके

७) कर्मवीर भाऊराव पाटील यांचे प्रा. सुनील खैरनार/३७
शैक्षणिक योगदान

८) एक असामान्य लोकनेता – प्रा. योगिता चोडणकर/४१
भाऊसाहेब बांदोडकर

९) प्रतिभावंत लेखक जी. ए. कुलकर्णी प्रा. अपर्णा पांडे /४५

१०) लोककलेला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रा. प्रवीण जाधव /४९
घेऊन जाणारा एक कर्तृत्ववान पुरुष म्हणजे
डॉ. गणेश चंदनशिवे

११) भारताच्या स्वातंत्र्यामध्ये प्रा. सारिका पाटील /५३
यशवंतराव चव्हाणांचे योगदान

१२) मराठ्यांच्या इतिहासामध्ये प्रा. रायसिंग पाटील /५७
इतिहासकारांचे योगदान : एक अभ्यास

१३) जंतूंच्या शत्रूंचा संशोधक : लुई पाश्चर वर्षा जोशी /६१

१४) रयतेचे राजे शिवाजी महाराज ॲड. महेंद्र शिंदे /६५
यांचे जीवन व कार्य

१५) अष्टपैलू कर्तृत्ववान खेळाडू – दत्ता शिंदे आशा शिंदे/६९

१६) आबा ! शहाजी कांबळे/७३

१७) डॉ. बाबुराव उपाध्ये : व्यक्तित्व आणि साहित्य मोहिनी लहारे/७६

# निश्चयाचा महामेरू डॉ. बाळासाहेब विखे पाटील : जीवन व कार्य

प्रा. रामदास पंढरीनाथ कातकडे

## सामाजिक बांधीलकी

ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकाराचे प्रारूप विकसित करणाऱ्या विठ्ठलराव विखे पाटील यांचा वारसा कृतिशीलतेने वृद्धिंगत करीत राज्याच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणावर आपला ठसा उमटविणारे एक महान व्यक्तिमत्त्व म्हणजे खा. बाळासाहेब विखे पाटील होय. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या गरजा, नव्या आकांक्षा वा इच्छा हे सर्व लक्षात घेवून व सखोल विचार करूनच अत्यंत व्यवहार्य ठरेल अशी सहकाराची कल्पना प्रत्यक्षात आणली गेली आणि परिणामी काय दिसून आला तर तो एक नवा इतिहासच निर्माण झाला. ज्या काळात विठ्ठलरावांनी सहकाराची सुरुवात केली त्या काळात पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची स्थिती मोठी बिकट होती. खरे तर सहकाराच्या मूळ संकल्पनेला एक वैश्विक मोल आहे, त्याचप्रमाणे सहकारी चळवळीतील अनुभवही वैश्विक स्तरावर मोलाचे ठरू शकतात.

महाराष्ट्रातील प्रत्येक भागात विखे पाटील यांच्या जीवनातील कथा सापडतील. खा. डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पावलावर पाऊल ठेवत महाराष्ट्राच्या विकासाठी आपले आयुष्य खर्ची केले. त्याचबरोबर ग्रामस्थ, गरीब शेतकऱ्यांचे जीवन सुलभ करणे आणि त्यांचे दु:ख कमी करणे हे विखे पाटील यांच्या जीवनाच्या केंद्रस्थानी होते. बाळासाहेब विखे पाटील यांनी नेहमीच समाजाच्या उन्नतीसाठी काम केले आहे. समाजात अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी गरीब आणि खेड्यांच्या समस्या सोडवण्यासाठी राजकरण हे माध्यम बनवण्यावर नेहमीच भर दिला आहे. मा.खा.डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी महाराष्ट्रातील सहकाराच्या यशस्वितेसाठी गावाच्या विकासासाठी, गरिबांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि त्यांचे योगदान पुढील पिढ्यांना प्रेरणा देईल. बाळासाहेब विखे पाटील यांनी महाराष्ट्रातील खेड्यातील पिण्याच्या आणि सिंचनाच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी प्रयत्न केले. तसेच खेड्यांमध्ये स्वावलंबनाची भावना रुजवण्यासाठी सतत प्रयत्न केले.

मा. खा. बाळासाहेब विखे पाटील यांनी राजकारणाला समाज बदलाचे माध्यम मानून काम केले. त्यांनी ग्रामविकास सहकार, सिंचन आणि शिक्षण क्षेत्रात मूलभूत काम केले आहे. सहकार चळवळीला त्यांनी वेगळा आयाम देण्याचे काम केले. त्याचबरोबर स्वत:तील साधेपणा जपत परिस्थितीला सामोरे

जाण्याचे धैर्य आणि ती बदलवण्याचा खंबीरपणा बाळासाहेब विखे पाटील यांनी दाखविला. सहकार चळवळ ही कोण्या एका जातीपुरती मर्यादित नसून ती सर्वसमावेशक आहे. असे मानून त्यांनी सर्वांना प्रतिनिधित्व दिले. खा. साहेबांनी पश्चिम घाटात पडणारे पावसाचे पाणी जे अरबी समुद्रात जावून मिळते. ते महाराष्ट्रात आणण्यासाठी महाराष्ट्र पाणी परिषदेची स्थापना केली. त्या माध्यमातून महाराष्ट्रभर पाणी प्रश्नांवर आंदोलने केली. त्यांचा व्यासंगाचा व अभ्यासाचा विषय म्हणजे अर्थशास्त्र व त्यातही ग्रामीण अर्थशास्त्र होय. म्हणूनच भारतातील अर्थतज्ज्ञ त्यांचे मित्र होते त्यामध्ये डॉ. वाय. के. अलही योजना आयोगाचे उपाध्यक्ष तसेच १३ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. विजय केळकर यांसारखी संत साहित्य व साहित्यिक वैज्ञानिक मार्क्सवादी, समाजवादी अशा विविध विचार प्रवाहाच्या संगमाचे ठिकाण म्हणजे मा. खा. डॉ. बाळासाहेब विखे पाटील होय.

डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचा स्वतंत्रपणे लोकसंपर्क सुरू झाला तो शेती कामाच्या माध्यमातून आणि याच शेतीच्या माध्यमातून ते सामाजिक प्रवाहात ओढले गेले. शेती व्यवसायाच्या जीवनपद्धतीवर विखे पाटील यांची नितांत श्रद्धा होती. खेड्यात राहत असूनही वडील विठ्ठलराव विखे पाटलांनी फुले यांच्या विचारांचे मर्म जाणाल आणि शेतकऱ्याला संघटित करून त्यांना आत्मविश्वास दिला, तरच बहुजन समाज सर्वार्थाने उभा राहील हे ओळखले. त्यासाठी त्यांनी सहकाराच्या माध्यमातून गावावर सहकारी संस्था बांधल्या व प्रचंड अडचणीवर मात करीत शेतकऱ्यांच्या सहकारी साखर कारखानदारीचा यशस्वी प्रयत्न केला. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी खा. डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्याबद्दल पुढील गौरवउद्गार काढले ''पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी दिलेला वारसा बाळासाहेबांनी समर्थपणे सांभाळला आणि कष्टकरी, शेतकऱ्यांच्या मनात स्वत:चे स्थान निर्माण केले.''

**ध्येय निश्चिती**

स्हकारी चळवळ ही केवळ उपेक्षितांची भौतिक प्रगती साधणारी चळवळ न राहता ती एक संस्कृती बनावी असे त्यांचे ध्येय आहे. सहकाराच्या माध्यमातून कृषी, औद्योगिक समाज निर्माण करणे एवढेच सीमित उद्दिष्ट्ये त्यांचे नाही, तर वैचारिक दृष्टया प्रगल्भ विज्ञाननिष्ठा, प्रयोगशील, नवविचारांचे आणि आचारांचे स्वागत करणारा, उदारमतवादी आणि सहिष्णू समाज निर्माण करणे हे त्यांचे स्वप्न होते व ते पूर्ण करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असायचे. प्रवरानगर ही सहकारी चळवळीची कर्मभूमी म्हणून ओळखली जाते. आपला शेतकरी, कामगार, कार्यकर्ता, विद्यार्थी आणि शिक्षकाने कलासुसंगत ज्ञान प्राप्त केले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषद आयोजित करण्यावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. कला, साहित्य, खेळ या क्षेत्रांतील विविध स्पर्धा, संम्मेलने, व्याख्यानमाला, चर्चासत्रे यांचे आयोजन

ते नेहमी करण्यास सांगत असत.

बाळासाहेबांनी अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, पाथर्डी, संगमनेर, केज इत्यादी सहकारी कारखान्यांच्या स्थापनेत पुढाकार घेतला होता. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक, महाराष्ट्र मद्यार्क निर्मिती संघाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. त्याचप्रमाणे प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे कारभार पाहिला. तसेच ४० वर्षे खासदार म्हणून ही त्यांनी काम पाहिले. प्रवरा सहकारी साखर कारखाना हा केवळ साखर उत्पादन करणारी यंत्रणा एवढ्यापुरताच मर्यादित न ठेवता त्या माध्यमातून अनेक कृषी प्रकल्प, रस्ते, पाझरतलाव, शिक्षणोत्तेजक पतपेढ्या, शैक्षणिक व आरोग्य सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध केल्या. पाच दशकांहून अधिक काळ राजकारणातून विविध पदे भूषविताना त्यांनी आपल्या व्यवहार चातुर्य आणि व्यवस्थापन कौशल्याचाही ठसा उमटविला. जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष पदापासून केंद्रीय मंत्रिपदापर्यंत प्रवास याच कौशल्यातून त्यांनी जनमानसाचे अचूक निदान करण्यात बाळासाहेब विखे पाटील इतरांपेक्षा दहा पावले नेहमी पुढे असत. राजकारणाच्या पलीकडे शेती, सिंचन आणि ग्रामीण विकास या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी ठाम आणि प्रागतिक भूमिका देवून आयुष्यभर त्यांचा पाठपुरवा केला. याच त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने सन २०१० मध्ये 'पद्मभूषण' या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले.

**शैक्षणिक कार्य**

शिक्षण हे उत्कर्षाच्या इमारतीचा पाया आहे आणि साक्षरता ही ज्ञान भंडाराची चावी आहे. हे जरी खरे असले तरी वाचता-लिहिता येणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर जगण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता येणे म्हणजे खरे शिक्षण होय. जेव्हा देशांत ग्रामीण भागात शिक्षणाबाबत फारशी चर्चा होत नव्हती तेव्हा डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून खेड्यातील तरुणांचे शिक्षण आणि कौशल्य विकासासाठी काम केले. सहकाराच्या माध्यमातून आपला राजकीय पाया भक्कम करतानाच खा. बाळासाहेब विखे पाटलांनी शेती आणि शिक्षणाच्या क्षेत्रात मोलाचे काम करीत खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाचे प्रारूप साकारले. लहान चणीची मूर्ती, साधा पेहराव आणि संयमित बोलणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये. लौकिकार्थाने त्यांचे एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण मात्र आयुष्याच्या शाळेत गिरवलेले धडे आणि तळागाळातील सर्व सामान्यांशी जुळलेली नाळ, यामुळे बाळासाहेबांच्या अनुभवाच्या शहाणपणापुढे भलेभले अधिकारी आणि सर्व पक्षांतील नेतेमंडळी माना डोलवत. 'आम्ही अडाणी, खेड्यातील माणसं' असे ते अनेकदा बोलत परंतु राजकारण, समाजकारण, सहकार शेती, अर्थकारण आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात त्यांचा शब्द नेहमीच मोलाचा राहिला.

महाराष्ट्र राज्यातील पहिले खाजगी तंत्रनिकेतन १९८० मध्ये प्रवरानगर येथे सुरू करून ग्रामीण शिक्षणाची चळवळ सुरू करण्याची मुहूतमेढ खा. बाळासाहेब विखे

पाटील यांनी रोवली. प्रवरा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सामान्यांसाठी त्यांनी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. आज मितीला प्रवरा शिक्षण संस्थेच्या छत्राखाली वेगवेगळी ११ तंत्रशिक्षण महाविद्यालये, ६ वरिष्ठ महाविद्यालये, ६ इंग्लिश माध्यमांच्या शाळा आणि ३२ मराठी माध्यमांच्या शाळा ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहेत. आज प्रवरेच्या विविध शाखांमध्ये जवळपास ४०००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याच प्रवरा शिक्षण संस्थेमध्ये बालवाडीपासून पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण उपलब्ध असल्याचे आपल्याला दिसून येते.

बाळासाहेब विखे पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रवरा परिसरासह विविध शैक्षणिक संस्थामध्ये देश-परदेशातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. केंद्रीय अवजड उद्योगमंत्री व केंद्रीय अर्थ खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम करताना विखे पाटील यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. प्रवरानगर परिसरासह जिल्ह्यातील विविध संस्थाच्या स्थापनेत बाळासाहेब विखे पाटील यांचा सहभाग होता. बोलण्यातील विनम्रता आणि निर्णयातील मुरब्बीपणा यांच्या बळावर बाळासाहेब विखे पाटील यांनी राजकारण आणि समाजकारणात मोठी झेप घेतली. शेतीमधील नवे तंत्रज्ञान, साखर उद्योगाला पूरक व्यवसायाची जोड यांबरोबरच ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा नेवून त्यांनी अनेक पिढ्या घडविण्याचे महान कार्य केले. त्यामुळेच लोणी-प्रवरा परिसर हा या विकासाचे मॉडेल ठरले आहे. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या स्मरणात राज्य पातळीवरील साहित्य पुरस्कार, कला क्षेत्रात दिला जाणारा पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार आणि राष्ट्रीय पातळीवरील खेळांच्या स्पर्धा म्हणजे प्रवरेच्या सहकाराच्या कर्मभूमीत समाजातील बहुरंगी आणि बहुढंगी घटकांची घेतलेली नोंद होय. साहेबांच्या शब्दांत सांगायचे झाले तर 'असेन मी नसेन मी कर्तृत्वातून दिसेन मी' ! नव्या पिढ्यांमध्ये राजकारण - समाजकारणाची नवी शैली पुढे येत असली तरी समाजाभिमुख राजकारणाचा वाटसरू, ग्रामविकासाचा ध्येयवेडा अवलिया दि. ३० डिसेंबर २०१६ रोजी आपली इहलोकीची यात्रा लौकिकार्थाने संपवून निघून गेले. अशा या कृतिशील नेत्यांच्या स्मृतींच्या पाऊलखुणा महाराष्ट्राच्या कायम स्मरणात राहतील. अशा या महापुरुषाला भावपूर्ण आदरांजली.

**संदर्भ ग्रंथ**

१. साधू अरुण, सहकार धुरीण, रोहन प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ११ जानेवारी २०१४.
२. देह वेचावा कारणी, राजहंस प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ३१ ऑक्टोबर २०१६.
३. मंगळवेढेकर राजा, भूमिपुत्र, प्रवरा प्रकाशन, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९७७.
४. सावंत शिवाजी, लढत, प्रवरा प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, १६ ऑगस्ट २००८.